# ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दूरध्वनी क्र. : ०२३१-२६६६००१, २६६६००२
फॅक्स क्र. : ०२३१- २६६६००१
E-mail : cgrfkolhapur@mahadiscom.in

महावितरण

कोल्हापूर परिमंडल,
" विद्युत भवन "२ रा मजला,
ताराबाई पार्क, कोल्हापूर- ४१६ ००३.

क्रमांक : काअ//ग्रातनिमं/अंतरिम केस क्र.०२ /१३-१४/ १४७ दिनांक : ३०.४.२०१३

प्रति,

श्री. बाळकृष्ण एम. घाडगे,
मु.पो. जत, ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली

२) कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली

— विरुध्द पक्षकार

## अंतरिम आदेश

श्री. बाळकृष्ण एम. घाडगे, रा. जत, ता. जत, जि. सांगली यांनी त्यांचे घरगुती वापराचे फेब्रुवारी २०१३ ते मार्च २०१३ चे बील अवास्तव आले असून ते दुरुस्त करुन मिळावे व सदर विद्युत देयकाच्या वसुलीसाठी वीज पुरवठा खंडीत करण्यात येवू नये यास्तव अंतरिम आदेश मिळण्यासाठी मंचामध्ये दि. २०.४.२०१३ ला तक्रार दाखल केली आहे.

प्रस्तुत प्रकरणी दि. ३०.४.२०१३ रोजी मंचामध्ये सुनावणी घेतली असतां, ग्राहक व ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वितरण कंपनीतर्फे श्री. मैलापुरे, सहाय्यक अभियंता, जत, श्री. लादे, दुय्यम अभिंयंता उपस्थित. वि.प.ने तक्रारीची प्रत सुनावणी नोटीस बरोबर मिळाली नाही अशी तक्रारी केली. आज दि. ३०.४.२०१३ रोजी लेखी म्हणणे दाखल केले. त्यामध्ये मीटर टेस्टिंगला पाठविल्याचे म्हटले आहे. यापूर्वी मंचाने दि. २०.४.२०१३ च्या पत्राने सुनावणीच्या तारखेपर्यंत ग्राहकाचा विद्युत पुरवठा खंडीत करण्यात येवू नये असे आदेश दिले आहेत. वादातील बील रु.२२,०००/- हे घरगुती कनेक्शनचे आहे.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

सुनावणी दरम्यान ३ महिन्याचे Average consumption ४५० युनिट व त्यानुसार वीज आकार व इतर आकार विचारांत घेता अंदाजे रु. २५००/- येते. ५४० युनिटसची रक्कम रु. ४०००/- वादातीत आहे, त्यातून ही रक्कम वगळल्यास थकीत बिलाची रक्कम रु. १५,०००/- ते १६,०००/- येते. मंचाने विचारणा केल्यावर ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांनी ग्राहकाच्या संमत्तीने रु. ४०००/- दोन हप्त्यात भरण्याची तयारी दर्शविली. मंचाचे असे मत झाले आहे की. ग्राहकाने वादातीत बिलाची रक्कम सोडून नियमित विद्युत बीले भरावीत व रु. ४०००/- ही रक्कम दोन हप्त्यात भरावी. मंचाने यापूर्वी दि. २०.४.२०१३ रोजी ग्राहकाचा वीज पुरवठा खंडीत करण्यात येवू नये असे आदेश दिलेले आहेत ते मंचाचे पुढील आदेश होईपर्यंत चालू राहतील. वि.प.ने मीटर तपासणी अहवाल, लोड रिपोर्ट व वादातील मीटर सेरिजमध्ये लावून त्याचा अहवाल ग्राहकाला व मंचाला कळवावा, त्यानंतर पुढील सुनावणी घेण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| सही | सही | सही |
| जी. सी. लेले | जी.बी. पानकर | बी.जी. पवार |
| सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |
| ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच कोल्हापूर |

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com